## पाहिजेत

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



## व्यवसाय

आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?

आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!

निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही

संपर्क : 8087459854



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६९ वा | शुक्रवार, दि. ०५ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# कर्जमाफीचा गाजावाजा; शेतकऱ्यांच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली !

## महायुती सरकारच्या योजनेवर विरोधकांचा घणाघात; 'अर्ध्याहून अधिक शेतकरी वंचित राहणार'

## जाचक अटींमुळे शेतकरी संतप्त, संघटनांकडून आंदोलनाचा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'वर विरोधी पक्षांनी आणि शेतकरी संघटनांनी जोरदार हल्लाबोल चढविला आहे. दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीची घोषणा करून सरकारने शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात जाचक अटी आणि निकषांमुळे लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असल्याची टीका विरोधकांकडून केली जात आहे.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आल्यानंतर सरकारने ती ऐतिहासिक असल्याचा दावा केला. मात्र योजना जाहीर होताच तिच्या अटी-शर्तींवरून वादाला तोंड फुटले. खासदार, आमदार, नगरसेवक, सरकारी कर्मचारी, अधिकारी तसेच २५ हजार रुपयांपेक्षा जास्त वेतन असलेल्या सरकारी किंवा अनुदानित संस्थांतील कर्मचाऱ्यांना योजनेतून वगळण्यात आले आहे. या अटींमुळे अनेक कुटुंबे लाभापासून वंचित राहतील, असा दावा विरोधकांनी केला आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे महाविकास आघाडी सरकारच्या काळात 'महात्मा जोतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना आता पूर्ण कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. अशा शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतचीच मदत मिळणार असल्याचे स्पष्ट झाल्याने ग्रामीण भागात नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

दरम्यान, ही योजना फक्त पीककर्ज आणि पुनर्गठित कजार्पुरतीच मर्यादित ठेवण्यात आली आहे. विहिरी, पाइपलाइन, ठिबक सिंचन, शेतीसाठी यंत्रसामग्री, दुग्धव्यवसायासाठी गायी-म्हशी खरेदी यासाठी घेतलेले कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा कोणताही लाभ मिळणार नाही. त्यामुळे प्रत्यक्षात संकटात सापडलेल्या हजारो शेतकऱ्यांना सरकारने जाणीवपूर्वक डावलल्याचा आरोप शेतकरी संघटनांनी केला आहे.

विशेष म्हणजे कर्जमाफीसाठी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित होऊन थकीत झालेल्या कर्जांनाच पात्रता देण्यात आली आहे. अनेक शेतकरी यापूर्वीच्या थकबाकीमुळे बँकांच्या काळ्या यादीत गेले आहेत. त्यांना नवीन पीककर्ज मिळत नाही आणि आता या कर्जमाफीतूनही त्यांना वगळले जाणार आहे. त्यामुळे सर्वाधिक गरजू शेतकरीच योजनेच्या कक्षेबाहेर राहणार असल्याची टीका होत आहे.

### शेतकरी कर्जमाफीचा निर्णय होणार, पण घोषणा नाही

शेतकरी कर्जमाफीबाबत बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट केले की, हा विषय मंत्रिमंडळाच्या (कॅबिनेट) पटलावर आहे. निवडणूक आयोगानेला मंजुरी दिली आहे, परंतु एक अट घातली आहे. त्यानुसार, सरकार या विषयाला मंजुरी देऊन पुढील प्रशासकीय कारवाई सुरू करू, मात्र त्याची अधिकृत घोषणा करता येणार नाही. त्यामुळे विधान परिषद निवडणूक संपल्यानंतरच शेतकरी कर्जमाफीची अधिकृत घोषणा केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### मोदी-फडणवीसांच्या घोषणा म्हणजे फसवणूक : संजय राऊत

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सरकारवर जोरदार टीका करताना म्हटले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणा म्हणजे फसवणुकीचा प्रकार झाला आहे. प्रत्येक योजनेत जनतेला आश्वासनांचे गाजर दाखवले जाते, मात्र प्रत्यक्ष लाभ मिळत नाही. शेतकऱ्यांनी आता सावध राहून भाजपच्या भूलथापांना बळी पडू नये."

### शेतकऱ्यांची क्रूर थट्टा : हर्षवर्धन सपकाळ

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या योजनेवर सडकून टीका करताना म्हटले की, "कर्जमाफीच्या नावाखाली अध्यार्हून अधिक शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक बाहेर ठेवण्यात आले आहे. ही योजना म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. सरकारने अटींचा सापळा रचून कर्जमाफीचा खरा उद्देशच संपवला आहे." राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची मागणीही त्यांनी केली.

### उर्वरित रक्कम शेतकरी कुठून भरणार? : विजय वडेट्टीवार

विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला थेट सवाल केला. "दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करणार आहात, पण त्यावरील उर्वरित लाखो रुपयांची रक्कम शेतकरी कुठून भरणार? सरकारने याचा विचार केला आहे का?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने कर्जमाफीची रक्कम जमा झाली पाहिजे. अन्यथा थकबाकीमुळे त्यांना नवीन पीककर्ज मिळणार नाही आणि खरीप हंगाम संकटात सापडेल, असा इशाराही त्यांनी दिला.




### कर्जमाफी की राजकीय स्टंट?

महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतल्याचा दावा केला असला, तरी विरोधकांच्या मते ही योजना म्हणजे कर्जमाफीपेक्षा राजकीय स्टंट अधिक आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा एकदा भंग झाल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होत असून, येत्या काळात हा मुद्दा राज्याच्या राजकारणात मोठा वाद निर्माण करण्याची चिन्हे दिसत आहेत.

### शेतकरी संघटना आक्रमक

राज्यातील विविध शेतकरी संघटनांनी या योजनेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने जाचक अटी हटवून सर्व प्रकारच्या कृषी कर्जांचा समावेश करावा, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनांनी दिला आहे. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असताना सरकारने निवडक शेतकऱ्यांनाच दिलासा देण्याचा निर्णय घेतल्याने ग्रामीण भागात संतापाची लाट उसळत आहे.

## दैनिक कटूसत्यच्या बातमीचा दणका...

## अकलूज येथील स्वस्त धान्य दुकानदार चौकशीच्या जाळ्यात

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज येथे तीन महिन्यांच्या स्वस्त धान्य वाटपात महाघोटाळा ?या मथळ्याखाली दिनांक 1 जून 2026 रोजी,पान नंबर 4 वरती दैनिक कटूसत्य या वृत्तपत्रामध्ये, बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर बातमीची दखल संबंधित माळशिरस पुरवठा विभागाने घेऊन, अकलूज येथील सर्वच स्वस्त धान्य दुकान चालक यांची चौकशी करून कार्यवाहिला सुरवात केली आहे.




अकलूज मधील दोन,तीन स्वस्त धान्य दुकाने सोडली तर सर्रास शासकीय धान्याचा काळाबाजार करण्याचे महापाप,अकलूज मधील स्वस्त धान्य दुकान चालक करत आहेत. हे सर्वश्रुत आहे.ग्राहकांना धान्य कमी वाटप करणे,घेतलेल्या धान्याची ग्राहकांना पावती न देणे, आणखी धान्य आले नाही, पुढील महिन्यात देतो असे म्हणून ग्राहकांची फसवणुक करणे,तक्रार वही ग्राहकांना न देणे,फलकावरती माहिती न लिहिणे असे सर्रास प्रकार घडत आहेत.असे असतानाही ग्राहक स्वस्त धान्य दुकान चालकांना,त्यांच्या गुंडगिरी वृत्तीमुळे जाब विचारत नाहीत.बचत गटाच्या नावावर काही स्वस्त धान्य दुकान आहेत परंतु नाव एकाच आणि गावं एकाच अशी परिस्थिती आहे.

मे महिन्यात सलग तीन महिन्यांचे धान्य शासनाकडून देण्यात आले होते. सलग तीन महिन्यांचे धान्य ग्राहकांना देणे बंधनकारक होते. परंतु माणुसकी सोडलेल्या काही स्वस्त धान्य दुकान चालक यांच्याकडून असे झाले नाही.म्हणून अकलूज मधील काही स्वस्त धान्य दुकानदारांच्या भ्रष्ट कारभारांना प्रकाशझोतात आणणे गरजेचे होते.आता कोणकोणती स्वस्त धान्य दुकाने चौकशीअंती पुरवठा विभागाच्या गळाला लागतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## माढा तालुक्यात पाणीटंचाई तीव्र

## आ. पाटील यांची जलसंपदा मंत्र्यांकडे धाव

माढा (कटूसत्य वृत्त) :- माढा तालुक्यात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कोळेगाव धरणातून सीना नदीत तातडीने पाण्याचे आवर्तन सोडण्यात यावे, अशी आग्रही मागणी आमदार अभिजित पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनही सादर केले.



माढा विधानसभा मतदारसंघातील सीना नदीकाठच्या अनेक गावांमध्ये सध्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नदीपात्रातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाल्याने परिसरातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळीही मोठ्या प्रमाणात घसरली आहे. परिणामी नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय शेती सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी झाल्याने पिकांवरही प्रतिकूल परिणाम होत असून, जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सीना नदीत तातडीने पाणी सोडणे आवश्यक असल्याचे आ. पाटील यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

यावेळी त्यांनी सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या अडचणींकडेही सरकारचे लक्ष वेधले. यापूर्वी पाणी सोडण्याच्या नियोजनातील त्रुटींमुळे सीना नदीला आलेल्या पुराचा फटका अनेक शेतकऱ्यांना बसला होता. अनेकांची शेती जमीन वाहून गेली, तर काहींच्या उपजीविकेची साधनेही नष्ट झाली होती. त्यामुळे भविष्यात पाणी सोडताना योग्य नियोजन करून शेतकऱ्यांचे नुकसान टाळावे, अशी मागणीही त्यांनी केली.

सीना नदीकाठच्या गावांतील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कोळेगाव धरणातून तातडीने पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक आणि शेतकरी व्यक्त करत आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळ्याची जय्यत तयारी

### लाखों शिवभक्तांची गर्दी उसळणार

**रायगड (कटूसत्य वृत्त):-** किल्ले रायगडावर ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी दरवर्षी हजारो शिवभक्तांची गर्दी होते. मात्र यावर्षी तापमान अधिक असल्याने शिवभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

गडाच्या पायथ्याशी तसेच गडावर विविध १३ वैद्यकीय पथके तैनात करण्यात येणार असून २४ तास रुग्णवाहिका आणि आवश्यक औषधांचा साठा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

सध्या तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे प्रचंड उकाडा जाणवत आहे. नागरिकांना उष्माघात, चक्कर येणे, थकवा जाणवणे अशा प्रकारच्या आरोग्याच्या समस्या जाणवत आहेत. त्यामुळे किल्ले रायगडावर येणाऱ्या



शिवभक्तांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज झाला आहे. आरोग्य विभागाने गडावर आणि पायथ्याशी विशेष वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका आणि मुबलक औषधसाठ्यासह सज्जता ठेवली आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान दोन दिवस एकूण १३ विशेष वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात येणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी गडाच्या पायथ्याशी व परिसरातील प्रमुख मार्गांवर २४ तास रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. याशिवाय प्रत्येक थांब्याच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

### प्रत्येक पथकात एक वैद्यकीय अधिकारी

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत एकूण १३ विशेष वैद्यकीय पथके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकारी, १ समुदाय आरोग्य अधिकारी व एक आरोग्यसेवकाचा समावेश आहे. ही पथके कोंझर पार्किंग, वाघ जंक्शन, चित दरवाजा, महादरवाजा, वाळुसरे पार्किंग, पाचाड धर्मशाळा, नाणे दरवाजा, शिवसृष्टी पार्किंग (पाचाड गाव), कावळ्याचा माळ, मदारी मेहतर येथे तैनात करण्यात येणार आहेत. तसेच पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात ओपीडी व राखीव पथके तैनात करण्यात येणार आहेत.

## पालखी सोहळ्यात वारकरी, भाविकांना आवश्यक सुविधा देण्यासोबतच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे- शितल तेली-उगले

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 25 जुलै 2025 रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या.



यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगर विकास प्रशासन अधिकारी योगेश डोके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली-उगले म्हणाल्या, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, वीज, आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. नातेपुते येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या वाढीव जागेबाबत तात्काळ कार्यवाही करावी. पालखीतळावरील अतिक्रमणे काढून घ्यावीत.

## मोहिते पाटील-सोपलांच्या खेळीने जयकुमार गोरेंचं स्वप्न उधळलं

### सोलापूरात देशमुखांचे राऊतांना चॅलेंज!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध व्हावी, हे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वप्न राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि बाशीर्चे आमदार दिलीप सोपल यांच्या युतीने उधळून लावले आहे.

गेली दोन दिवसांपासून सोलापुरात तळ ठाकूनही विधान परिषदेची निवडणूक अखेर लागली असून भाजपचे राजेंद्र राऊत यांना पवारांच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांचे आव्हान असणार आहे.

विधान परिषदेच्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी छाननीनंतर सात उमेदवार रिंगणात होते. त्यात भाजपचे माजी आमदार राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांचे चिरंजीव जीवन जानकर, आमदार दिलीप सोपल समर्थक नागेश अक्कलकोटे, शिवसेनेचे महेश साठे, रमेश बारसकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धनजंय डिकोळे यांचा समावेश होता.



काँग्रेस उमेदवाराचा अर्ज बाद होताच धैर्यशील मोहिते पाटील यांनी विरोधकांच्या रणनीतीची सूत्रे होती घेतली. त्यांनी बाशीर्चे आमदार दिलीप सोपल यांच्याशी चर्चा करून निवडणूक निकराने लढविण्याचा निर्णय घेतला. एकास एक उमेदवार देण्यासाठी इतरांनी माघार घ्यावी, असे उत्तम जानकरांच्या बंगल्यावर ठरविण्यात आले. मोहिते पाटील-सोपल जोडीने निवडणूक कोणत्याही परिस्थितीत बिनविरोध होऊ द्यायची नाही, असा चंगच बांधल्याचे दिसून आले.

दुसरीकडे, पालकमंत्री जयकुमार गोरे हे कालपासून सोलापुरात तळ ठाकून होते. विरोधकांकडे संख्याबळ अत्यंत तोकडे आहे, त्यामुळे विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध करावी, अशी त्यांची पहिल्या दिवसांपासून मनीषा होती. त्यासाठी ते सूत्रे हलवत होते. राजेंद्र राऊत यांची निवड बिनविरोध व्हावी, यासाठी पालकमंत्री गोरे यांनी सर्वच प्रकारची फिल्डिंग लावली होती.

माघारीच्या शेवटच्या दिवशी महायुतीमधील शिवसेनेचे महेश साठे, रमेश बारसकर यांनी माघार घेतली. महाविकास आघाडीच्या रणनीतीनुसार जीवन गोरे, नागेश अक्कलकोटे आणि कुर्डूवाडीचे माजी नगराध्यक्ष धनंजय डिकोळे यांनी माघार घेतली. त्यामुळे सोलापूरची निवडणूक बिनविरोध होते की काय, अशी परिस्थिती निर्माझ झाली होती. मात्र, मोहिते पाटील-सोपल युतीने निवडणूक बिनविरोध होण्याचे सर्व प्रयत्न असफल ठरवले.

### एकास एक लढत

महायुतीमधील शिवसेनेचे महेश साठे, रमेश बारसकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धनंजय डिकोळे, नागेश अक्कलकोटे, तर आमदार जानकर यांचे चिरंजीव जीवन जानकर यांनी माघार घेतली. त्यामुळे सोलापुरात आता भाजप विरुद्ध मोहिते पाटील समर्थक देशमुख अशी एकास एक लढत होणार आहे. भाजप आणि महायुतीकडे बहुमताचा आकडा मोठा असली तर सर्वपक्षीय विरोधक भाजपला जोरदार टक्कर देण्याच्या मनस्थितीत आहेत.

### देशमुख-गोरे भेट

दरम्यान, उमेदवार वसंतराव देशमुख आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सोलापूरमधील एका हॉटेलमधील भेट झाली. पण, त्या भेटीचा तपशील समजू शकला नाही. मात्र, त्यातून बिनविरोध निवडीसाठी तोडगा निघू शकला नाही.

## संपादकीय

# सरकारवर विश्वास ठेवायचा का?

सरकारवर विश्वास ठेवायचा तरी किती? सोन्याच्या साठ्यापासून कोविड मृत्यूंपर्यंत प्रश्नचिन्हांचा डोंगर..! लोकशाही व्यवस्थेत सरकार आणि नागरिक यांच्यातील नात्याचा पाया हा विश्वासावर उभा असतो. सरकारने दिलेली माहिती अचूक, पारदर्शक आणि पडताळता येण्याजोगी असेल, तरच नागरिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात. मात्र जेव्हा वारंवार अधिकृत दावे आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामध्ये तफावत दिसून येते, तेव्हा संशय निर्माण होणे स्वाभाविक ठरते. आज भारतीय अर्थव्यवस्था, कोविड मृत्यूंची आकडेवारी, इंधन टंचाईचे दावे आणि आता देशाच्या सोन्याच्या साठ्याबाबत सुरू झालेला वाद यामुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कोविड महामारीच्या काळात केंद्र सरकारने अधिकृतरीत्या सुमारे पाच लाख मृत्यूंची नोंद दिली होती. परंतु त्याच काळात जागतिक आरोग्य संघटना (WHO), वैद्यकीय नियतकालिक The Lancet आणि अनेक स्वतंत्र संशोधकांनी भारतातील प्रत्यक्ष मृत्यूंची संख्या अधिकृत आकड्यांपेक्षा कितीतरी जास्त असण्याची शक्यता व्यक्त केली होती. या विषयावर मोठा वाद झाला. सरकारने परकीय संस्थांचे निष्कर्ष फेटाळले, तर तज्ज्ञांनी अधिक पारदर्शक आकडेवारीची मागणी केली. या वादाचा निकाल काहीही लागला असला, तरी नागरिकांच्या मनात अधिकृत माहितीबाबत संशयाचे बीज पेरले गेले. याच पार्श्वभूमीवर इंधनपुरवठ्याबाबतचे अलीकडील उदाहरण पाहिले तर चित्र आणखी स्पष्ट होते. काही आठवड्यांपूर्वी सरकारकडून किंवा अधिकृत यंत्रणांकडून इंधन टंचाई आणि दरवाढीच्या बातम्या फेक असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र त्यानंतर अनेक भागांत पुरवठ्याविषयी चिंता, दरवाढीची शक्यता आणि बाजारातील अस्थिरता समोर आली. त्यामुळे "सरकार सांगते तेच अंतिम सत्य" असा विश्वास अनेकांच्या मनातून ढासळत चालल्याचे दिसते.

आता चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे तो देशाच्या सोन्याच्या साठ्याचा. आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था ब्लूमबर्गने भारताने काही प्रमाणात सोने विकल्याचा दावा केल्याची चर्चा रंगली. त्यानंतर अधिकृत स्तरावर हा दावा चुकीचा असल्याचे सांगण्यात आले. परंतु प्रश्न इथे संपत नाही. कारण केवळ नकार देणे आणि शंका दूर होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

रिझर्व्ह बँकेच्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशाकडे असलेल्या सोन्याच्या साठ्याचे एकूण मूल्य काही कालावधीत सुमारे ११.४५ लाख कोटी रुपयांवरून १०.९८ लाख कोटी रुपयांपर्यंत घसरल्याचे दिसते. म्हणजेच जवळपास चार टक्क्यांची घट. या घटामागे दोनच प्रमुख कारणे असू शकतात. एकतर जागतिक बाजारात सोन्याचे दर कमी झाले असतील किंवा प्रत्यक्षात काही प्रमाणात सोने विकले गेले असेल. जर पहिली शक्यता खरी असेल, तर त्यासंबंधी स्पष्ट माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. आणि जर दुसरी शक्यता नसल्याचा सरकारचा दावा असेल, तर त्यासाठी अधिक अद्ययावत आणि सविस्तर आकडेवारी सार्वजनिक करणे आवश्यक होते.

याच ठिकाणी सरकारच्या संवादशैलीवर प्रश्न उपस्थित होतो. कोणत्याही संवेदनशील आर्थिक विषयावर संशय निर्माण झाला तर तो दूर करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे संपूर्ण डेटा जनतेसमोर ठेवणे. "हे खोटे आहे" एवढे सांगून चर्चा संपत नाही. उलट अशा पद्धतीमुळे संशय आणखी वाढतो. जर रिझर्व्ह बँकेकडे अद्ययावत आकडेवारी उपलब्ध असेल, तर ती सार्वजनिक करून वादाला पूर्णविराम देणे शक्य होते.

लोकशाहीत नागरिकांना सरकारवर आंधळा विश्वास ठेवण्याची सक्ती नसते. उलट सरकारची जबाबदारीच अशी असते की त्याने आपल्या प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयाबाबत आणि आर्थिक स्थितीबाबत पारदर्शक माहिती द्यावी. विश्वास हा मागून मिळत नाही, तो कमवावा लागतो. आणि तो कमावण्याचा मार्ग म्हणजे सत्य, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व.

आज देशासमोर आर्थिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक आव्हाने उभी आहेत. अशा वेळी अफवा, अर्धवट माहिती आणि परस्परविरोधी दावे यामुळे जनतेत अस्वस्थता निर्माण होते. त्यामुळे सरकार, रिझर्व्ह बँक आणि संबंधित संस्थांनी अधिक खुल्या पद्धतीने माहिती देणे ही काळाची गरज आहे.

सोन्याचा साठा विकला गेला की नाही, हा मुद्दा एका दिवसात स्पष्ट होऊ शकतो. पण त्यापेक्षा मोठा प्रश्न आहे तो विश्वासाचा. कारण एकदा नागरिकांचा विश्वास डळमळीत झाला, तर केवळ निवेदने देऊन तो पुन्हा निर्माण करता येत नाही. त्यासाठी आकडे बोलले पाहिजेत, तथ्ये समोर आली पाहिजेत आणि शासनाने पारदर्शकतेची खरी बांधिलकी दाखवली पाहिजे.

# पर्यावरणसंवर्धन, शाश्वत विकास आणि मानवजातीचे भविष्य

मानव आणि निसर्ग यांचे नाते हे सृष्टीच्या निर्मितीइतकेच प्राचीन आहे. पृथ्वीवरील जीवनाची संपूर्ण व्यवस्था पर्यावरणावर आधारलेली आहे. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी, पर्वत, नद्या, समुद्र, जंगल आणि वातावरणातील विविध घटक यांच्या परस्पर संबंधातून पर्यावरणाची निर्मिती होते. पर्यावरण हा केवळ एक शब्द नसून तो जीवनाचा पाया आहे. आपण घेत असलेला प्रत्येक श्वास, आपण पित असलेले पाणी, आपण खात असलेले अन्न आणि आपल्या जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक नैसर्गिक गोष्ट पर्यावरणातूनच प्राप्त होते. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण म्हणजे मानवाच्या अस्तित्वाचे संरक्षण होय. परंतु गेल्या काही दशकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या झपाट्याने झालेल्या विस्तारामुळे पर्यावरणावर अभूतपूर्व ताण निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अविचारी वापर, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामान बदल यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ जून हा दिवस ह्यजागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. जागतिक पर्यावरण दिन हा जगातील सर्वात मोठा पर्यावरणीय जनजागृती उपक्रम मानला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून या दिवसाची सुरुवात झाली. १९७२ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे ह्यमानवी पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाची गरज आणि विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्व जगासमोर मांडण्यात आले. या परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७४ पासून या दिवसाचे औपचारिक आयोजन सुरू झाले. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध विषयांवर आधारित कार्यक्रम, मोहिमा, परिसंवाद, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. या दिवसाचा मुख्य उद्देश लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणीय समस्यांकडे लक्ष वेधणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृती करण्यास प्रेरित करणे हा आहे.

पर्यावरणाचे महत्त्व समजून घेताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की मानव हा निसर्गाचा स्वामी नसून त्याचा एक अविभाज्य घटक आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्य असते. जंगल कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू निर्माण करतात. नद्या आणि जलस्रोत मानवाला पाणी उपलब्ध करून देतात. माती अन्नधान्य उत्पादनासाठी आवश्यक असते. विविध प्राणी आणि कीटक परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत करतात. या सर्व घटकांमधील सुसंवादामुळे पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे. परंतु मानवाने आपल्या गरजा आणि सुखसोयी वाढविण्यासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. परिणामी पर्यावरणीय संतुलन बिघडले आणि आज जग अनेक गंभीर संकटांचा सामना करत आहे.

आजच्या काळातील सर्वात मोठी पर्यावरणीय समस्या म्हणजे हवामान बदल. औद्योगिक क्रांतीनंतर जीवाश्म इंधनांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले. हे वायू पृथ्वीभोवती उष्णतेचे आवरण निर्माण करतात आणि त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. या प्रक्रियेला जागतिक तापमानवाढ असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे, हवामानातील बदल तीव्र होत आहेत आणि नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत आहे. जगभरात दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी आणि चक्रीवादळे अधिक वारंवार घडू लागली आहेत. हवामान बदलाचा परिणाम केवळ पर्यावरणावरच नव्हे तर शेती, आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक जीवनावरही होत आहे. जंगल हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. जंगलांमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण नियंत्रित राहते, पावसाचे चक्र सुरळीत राहते आणि जैवविविधतेचे संरक्षण होते. पृथ्वीवरील लाखो वनस्पती आणि प्राणी जंगलांमध्ये आश्रय घेतात. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे, खाणकामामुळे, औद्योगिक प्रकल्पांमुळे आणि विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे. जंगलांचा ऱ्हास झाल्याने वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगलतोडीमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते आणि हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे वृक्षारोपण आणि



वनसंवर्धन हे पर्यावरण संरक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

जलसंपदा ही मानवाच्या जीवनासाठी अत्यावश्यक आहे. पाणी नसल्यास जीवन अशक्य आहे. परंतु आज जगभरात जलसंकट तीव्र होत आहे. लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, शेतीसाठी होणारा अतिवापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन यांमुळे अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. नद्या आणि तलावांमध्ये औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक पदार्थ मिसळल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होते. भविष्यात पाणी हे संघर्षाचे प्रमुख कारण ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, जलप्रदूषण नियंत्रण आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

वायुप्रदूषण ही आधुनिक जगासमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. वाहनांचा धूर, कारखान्यांमधून होणारे उत्सर्जन, वीजनिर्मितीसाठी वापरले जाणारे जीवाश्म इंधन आणि कचरा जाळण्याच्या प्रक्रियेमुळे वातावरणात घातक वायूंचे प्रमाण वाढत आहे. वायुप्रदूषणामुळे दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयरोग आणि कर्करोगासारखे गंभीर आजार वाढत आहेत. अनेक महानगरांमध्ये हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. स्वच्छ हवा ही मानवाचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

प्लास्टिक प्रदूषण हा पर्यावरणासाठी वाढता धोका आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे अनेक सुविधा निर्माण झाल्या असल्या तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. प्लास्टिक सहज विघटित होत नाही. त्यामुळे ते जमिनीमध्ये, नद्यांमध्ये आणि समुद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचते. समुद्रातील प्लास्टिक कचऱ्यामुळे सागरी जीवांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पक्षी आणि प्राणी प्लास्टिक गिळल्यामुळे मृत्युमुखी पडतात. सूक्ष्म प्लास्टिकचे कण आता मानवी शरीरातही प्रवेश करू लागले आहेत. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संतुलन टिकविण्यासाठी जैवविविधतेचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची विविधता म्हणजे जैवविविधता. जैवविविधतेमुळे परिसंस्था कार्यरत राहतात आणि मानवाला अन्न, औषधे, इंधन तसेच इतर अनेक संसाधने उपलब्ध होतात. परंतु अधिवासांचा नाश, प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे अतिरेकी शोषण यांमुळे अनेक प्रजाती धोक्यात आल्या आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा पर्यावरणीय संकटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे वन्यजीव संरक्षण, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांचे संवर्धन आवश्यक आहे.

भारत हा जैवविविधतेने समृद्ध देश आहे. हिमालय, पश्चिम घाट, सुंदरबन, ईशान्य भारतातील जंगले आणि राजस्थानचे वाळवंट या विविध परिसंस्था भारतात आढळतात. भारतीय संस्कृतीत निसर्गाला विशेष स्थान आहे. वृक्षपूजन, नदीपूजन आणि प्राण्यांप्रती आदरभाव या परंपरा पर्यावरणपूरक जीवनशैलीचे प्रतीक आहेत. ऋषी-मुनींनी निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. आजच्या काळात या मूल्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.

पर्यावरण संरक्षणामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होते. पर्यावरणीय समस्यांची जाणीव, संसाधनांचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक सवयी यांचा विकास शिक्षणाद्वारे होतो. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारखे उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना विकसित होते.

विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतात. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैवऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या नूतनीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा वापर वाढविल्यास कार्बन उत्सर्जन कमी करता येते. इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, हरित इमारती आणि स्मार्ट तंत्रज्ञान यांचा वापर पर्यावरण संरक्षणासाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखता येऊ शकतो.

कचरा व्यवस्थापन हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि उपभोगवादी जीवनशैलीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. योग्य व्यवस्थापन न झाल्यास कचरा पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करतो. घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत निर्मिती यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. ह्यकमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्निर्मिती करा' हे तत्त्व पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. जलप्रदूषण वाढत आहे आणि जैवविविधतेवर परिणाम होत आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत कृषी पद्धती पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. जलसंधारण, मृदसंवर्धन आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर यांमुळे शेती अधिक शाश्वत बनू शकते.

पर्यावरण संरक्षणासाठी शासन, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. विविध कायदे, धोरणे आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु केवळ सरकारी यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. पाणी वाचवणे, वीज बचत करणे, झाडे लावणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात.

शाश्वत विकास ही आजच्या काळातील सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही, अशा प्रकारे विकास करणे म्हणजे शाश्वत विकास होय. आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणीय न्याय, संसाधनांचे समान वाटप आणि हरित विकास या संकल्पनांवर भर देणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संकटे ही कोणत्याही एका देशापुरती मर्यादित नाहीत. हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. विकसित आणि विकसनशील देशांनी समान जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संरक्षणासाठी कार्य करणे गरजेचे आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की पृथ्वी ही केवळ आपल्या पिढीची मालमत्ता नाही. ती भावी पिढ्यांसाठी जपण्याची अमूल्य ठेव आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे भविष्याचे रक्षण करणे होय. प्रत्येक झाड, प्रत्येक नदी, प्रत्येक सजीव आणि प्रत्येक नैसर्गिक संसाधन पृथ्वीच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नाही तर मानवतेप्रती असलेली नैतिक बांधिलकी आहे.

आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचा, नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याचा आणि पृथ्वीला अधिक हरित, स्वच्छ व सुरक्षित बनविण्याचा दृढ संकल्प करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधून मोठा बदल घडू शकतो. निसर्गाशी सुसंवाद साधून, शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारून आणि पर्यावरण संवर्धनाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवूनच आपण उज्ज्वल, सुरक्षित आणि समृद्ध भविष्याची निर्मिती करू शकतो. म्हणूनच या जागतिक पर्यावरण दिनी एकच संदेश सर्वत्र पोहोचला पाहिजे तो म्हणजे 'पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा आणि मानवजातीचे भविष्य सुरक्षित करा.'



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# बेवारस मयताबाबत संपर्क साधण्याचे आवाहन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मौजे विसावा ते भुटुंबरे रेल्वे मार्गावरील रुळाजवळ दि.02 जून 2026 रोजी एक अनोळखी महिला मयत अवस्थेत मिळून आली आहे. सदर मयत महिलेबाबत माहिती असल्यास सबंधितांनी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनशी संपर्क साधवा असे, आवाहन करण्यात आले आहे.

अनोळखी मयत महिले वय अंदाजे 50 ते 55 वर्षे असून , उंची 5.5 इंच, , रंग गोरा, केस काळे-पांढरे, अंगावर राखाडी रंगाची साडी, पिवळ्या रंगाचा परकर, तसेच हाताच्या अंगठ्यावर ओम गोंदलेले असे मयत महिला वर्णन आहे. संबधीतांनी तसेच ओळखीच्या व्यक्तीने याबाबत पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनशी संपर्क साधवा असे, आवाहनही करण्यात आले आहे.

# कन्हेरगांव ग्रामपंचायतीत भ्रष्टाचाराचा स्फोट?

## युवकांचा ग्रामपंचायतीवर धडक मोर्चा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** कन्हेरगांव (ता. माढा) येथील ग्रामपंचायतीमध्ये विविध विकासकामे, निधी खर्च आणि प्रशासनाच्या कामकाजाबाबत निर्माण झालेल्या शंकांच्या पार्श्वभूमीवर गावातील युवकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत युवकांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारत जाब मागितला.

कुर्डूवाडी पंचायत समितीच्या वतीने ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी कृषी विस्तार अधिकारी धनंजय मिसाळ, शाखा अभियंता पांडुरंग हांडे, कनिष्ठ अभियंता गणेश खत्री, ग्रामविकास अधिकारी हनुमंत देशमुख तसेच बाबासाहेब धोत्रे यांनी मंगळवारी (दि. २) कन्हेरगांवला भेट दिली.

यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या बैठकीत युवकांनी विकासकामांमधील कथित अनियमितता, निधीच्या खर्चातील पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. युवकांच्या आक्रमक प्रश्नांमुळे अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.





"गावाच्या विकासासाठी आलेला कोट्यवधींचा निधी नेमका कुठे खर्च झाला?", "मंजूर विकासकामांची प्रत्यक्ष स्थिती काय आहे?", "ग्रामस्थांपासून माहिती का लपवली जाते?" अशा प्रश्नांचा भडीमार युवकांनी केला. ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार सिद्धेश्वर ताटे व महेश माने यांनी केली.

गावाच्या विकासासाठी मंजूर झालेल्या निधीचा योग्य वापर होत आहे की नाही, याबाबत उत्तरांची मागणी करत युवकांनी एकजूट दाखवली. या घडामोडींमुळे कन्हेरगांवचे राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले असून प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

"गावाचा पैसा, गावाचा हिशोब; उत्तर द्यावेच लागेल," अशी ठाम भूमिका घेत युवकांनी पारदर्शक प्रशासनासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### तातडीने चौकशीची मागणी

कन्हेरगांव ग्रामपंचायतीअंतर्गत चौदावा व पंधरावा वित्त आयोगातून मंजूर झालेल्या अनेक विकासकामांमध्ये सरपंच, ग्रामसेवक, काही ग्रामपंचायत सदस्य आणि ठेकेदार यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही विकासकामे प्रत्यक्षात न होता त्यांची बिले काढण्यात आल्याचाही दावा करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर तातडीने कारवाई करावी.

– **सिद्धेश्वर ताटे,** तक्रारदार

### कारवाई न झाल्यास उपोषण

कन्हेरगांवमधील कथित भ्रष्टाचाराच्या कामांची पाहणी करण्यासाठी पंचायत समितीचे अधिकारी गावात आले होते. पाहणीदरम्यान काही कामांबाबत गंभीर त्रुटी त्यांच्या निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने अहवाल सादर करून दोषींवर कारवाई करावी. अन्यथा येत्या चार दिवसांत गावातील युवकांना सोबत घेऊन उपोषण आंदोलन छेडण्यात येईल.

– **महेश माने**

# मोहोळ तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्याची ग्राहक समितीची मागणी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्याची ग्राहक समिती वतीने तहसीलदार यांना निवेदन.

मोहोळ तालुक्यात सद्या अवैध धंद्याना ऊत आला आहे. तालुक्यातील भीमा नदी, सीना नदी, भोगावती नदी तील अवैद्य वाळू उपसा चालू आहे. वाळू चोरी मोठया प्रमाणात होता असल्यामुळे नदीत नदीत मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत. पाणी असल्यामुळे नदी काटच्या शेतकरी यांना त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. सरकारचा महसूल बुडत आहे. मुरूम उपसा रॉयल्टी न भरता मुरूम उपसा चालू आहे. त्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे.

तसेच तालुक्यात दारू, मटका, जुगार मोठया प्रमाणात चालू आहे. त्यामळे तरुण पीडी व्यसनाधीन बनून बरबाद होत आहे.महिलांना त्रास सहन करावा लागत आहे.

तसेच गॅस डीलर वाले गॅस चा



काळा बाजार करीत आहेत. त्यांचे सब डीलर ग्राहकांची आर्थिक पिळवणूक करून जास्त पैशाने गॅस टाकी देत आहेत.

कृषी केंद्र वाले खते व औषध बोगस व जास्त किंमतीने विकत आहेत. ई महाराष्ट्र सेवा केंद्र चालक ग्राहकांची जास्त पैशाची मागणी करून पिळवणूक करीत आहेत.

अशी अवैध कामे जेवण करीत आहेत. त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. जे अधिकारी त्यांना पाठीशी घालत असतील त्यांच्या वर सुद्धा कारवाई करण्याची मागणी ग्राहक समिती तर्फे करण्यात आली.

कारवाई ण केल्यास ग्राहक समिती तर्फे सोमवार दि. 8/6/26 रोजी तहसील कार्यालय आवारात मोहोळ येथे उपोषण करण्यात येणार आहे.

आशा आशयाचे निवेदन धाईजे नायब तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

हे निवेदन तानाजीराव गुंड यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आले.

यावेळी संतोष कोल्हाळ जि. अध्यक्ष, आनंदराव देशमुख ता. अध्यक्ष,बबनराव नरुटे शेतकरी आघाडी जि. अध्यक्ष, अल्पसंख्यांक आघाडी आसपाक बागवान, अल्पसंख्यांक आघाडी कासीम पठाण, पपू घोडके जि. उपाध्यक्ष,किसन गायकवाड ता. उपाध्यक्ष, आकाश जगताप ता. उपाध्यक्ष, मंगल नाईकनावरे प्रदेश महिला,अंजली मोहिते जि. महिला अध्यक्ष, सारिका गायकवाड संस्कृतिक विभाग जि. अध्यक्ष,लता पाटील ता. महिला अध्यक्ष,लक्ष्मी चव्हाण महिला शहर अध्यक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वात्रटिका

### तो अमीर आहे

मिळता मिळेना म्हणून
कोणी चाळीशी ओंलाडतो...
साठी नंतरही कोणी तरी
तिसऱ्यांदा बोहल्यावर चढतो...
फिल्मी जगणं फिल्मी वागणं
फिल्मीच त्यांचं आखं जीवन...
तीन तीन मिळतात त्यांना पण
एकीसाठी आमची वणवण...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्रशासनाची वाट न पाहता नागरिकांनी घेतला स्वच्छतेचा पुढाकार



**दौंड (कटूसत्य वृत्त):-** "स्वच्छ परिसर, सुंदर परिसर" या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवत पाटस येथील चैतन्य रेसिडेन्सीच्या फ्लॅटधारकांनी परिसर स्वच्छतेचा आदर्श उपक्रम राबविला आहे. सोसायटीच्या बाजूला मोठ्या प्रमाणात साचलेल्या कचऱ्याची जेसीबी मशीनच्या सहाय्याने साफसफाई करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून परिसरात काही नागरिकांकडून विनाकारण कचरा टाकला जात असल्याने अस्वच्छता निर्माण झाली होती. यामुळे दुर्गंधी, आरोग्यविषयक समस्या तसेच परिसराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत होता. याची दखल घेत चैतन्य रेसिडेन्सीच्या रहिवाशांनी प्रशासनाची वाट न पाहता स्वतः पुढाकार घेऊन परिसर स्वच्छ करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी रहिवाशांनी प्रशासनाकडे परिसरात कचरा व घाण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांमुळे स्वच्छता अभियानाला बाधा येत असून अशा प्रवृत्तींना आळा घालणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच नागरिकांनीही सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून परिसरात कचरा टाकणाऱ्यांना वेळोवेळी समज द्यावी, त्यांना रोखावे आणि आवश्यक असल्यास अशा व्यक्तींचे फोटो अथवा व्हिडीओ काढून संबंधित प्रशासनाकडे तक्रार करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. नागरिक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच स्वच्छ व निरोगी परिसर निर्माण होऊ शकतो, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

चैतन्य रेसिडेन्सीच्या रहिवाशांच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत असून इतर नागरिकांनीही यापासून प्रेरणा घेऊन आपल्या परिसराच्या स्वच्छतेसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. याकामी हर्षद बंदीशी, अजिंक्य कुदळे, ललित पुरोहित, महेश कदम, शुभम गायकवाड, प्रशांत गायकवाड, दत्तात्रय गवळी, योगेश सोनवणे, शहाजी इंगवले यांचे योगदान मिळाले.

# तुकाराम मुंढेना साखर आयुक्त करा; वसंत साळुंखे यांची मागणी



**दौंड (कटूसत्य वृत्त):-** सामान्य शेतकऱ्यांशी गोड वागणारा कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची साखर आयुक्त पदी नियुक्ती करावी अशी मागणी जय शिवसंग्राम संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वसंत साळुंखे यांनी केली आहे.

तुकाराम मुंढे सध्या राज्याचा अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाचे आयुक्त Commissioner म्हणून कार्यरत आहेत. पदभार स्वीकारल्यापासूनच त्यांनी दुधात भेसळ, रासायनिक फळे आणि बनावट उत्पादनांविरोधात संपूर्ण राज्यभरात धडक कारवाईचा धडाका लावला आहे. त्यांच्या या कारवाईमुळे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या कंपन्या आणि भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत. त्यांच्या या धडाकेबाज आणि पारदर्शक कारभारामुळे सध्या साखर कारखान्यांमधील अनियमितता आणि साखर सम्राटांनी सरकारचे बुडालेले हजारो कोटी रुपये वसूल होईल साखर कारखाने भ्रष्टाचार मुक्त होऊन साखर उद्योगाला व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील व साखर सम्राटांना चाप बसेल अशी मागणी जय शिवसंग्राम संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वसंत साळुंखे यांनी केली आहे.

# मार्कंडेय रुग्णालयात अत्याधुनिक 'फॅको मशीन' दाखल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** पूर्व भागातील गरीब व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरलेल्या श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी अत्याधुनिक अल्कॉन सेच्युरियन कंपनीचे फॅको मशीन दाखल झाले आहे. या मशीनचा शुभारंभ रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

मार्कंडेय रुग्णालयात सातत्याने आधुनिक वैद्यकीय उपकरणांची भर पडत असून त्याचा थेट लाभ रुग्णांना होत आहे. नव्याने दाखल झालेल्या फॅको मशीनमुळे नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांची मोठी सोय होणार आहे.

या मशीनचे वैशिष्ट्य म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हे उपकरण देशातील मोजक्याच रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे. या मशीनच्या साहाय्याने मोतीबिंदूची शस्त्रक्रिया अवघ्या १० मिनिटांत पूर्ण करता येते. तसेच विनाइंजेक्शन आणि विनाटाके शस्त्रक्रिया होणार असल्याने रुग्णांना कमी त्रास सहन करावा लागतो. उपचारानंतर रुग्ण अल्पावधीतच घरी परतू शकतात, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

रुग्णालय प्रशासनाने सांगितले की, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियेची अचूकता वाढणार असून रुग्णांना अधिक सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पूर्व भागातील तसेच जिल्ह्यातील नेत्ररुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी रुग्णालयाचे चेअरमन डॉ. माणिक गुररम, व्हाइस चेअरमन रमेश विडप, डॉ. लता मिलाकोल, अशोक आडम, राजेशम येमूल, सुधाकर गुंडेली आदी उपस्थित होते. तसेच नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. अमित पोरेंडी, डॉ. क्षमा कदम, डॉ. मंजूनाथ पाटील, डॉ. भास्कर विटकूल, डॉ. एस. जयराम तसेच प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेत यांच्यासह वैद्यकीय व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

**फॅको मशीनची वैशिष्ट्ये**

- मोतीबिंदू शस्त्रक्रिया अवघ्या १० मिनिटांत पूर्ण
- विनाइंजेक्शन व विनाटाके शस्त्रक्रिया
- कमी वेदना व कमी त्रास
- जलद रिकव्हरी, रुग्ण लवकर घरी परतू शकतात
- अत्याधुनिक व उच्च अचूकतेचे तंत्रज्ञान
- नेत्ररुग्णांसाठी अधिक सुरक्षित आणि परिणामकारक उपचार सुविधा


**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.

**जाहिर प्रसिध्दीकरण**

पावसाळ्याच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे/चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्तहानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांनी/भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वतः करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारती मधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणेबाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासणी करुन घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मध्ये २.१.७ Repairs to Building तरतूद असून सदर तरतुदीप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस कळवून परवानाधारक आर्कीटेक्ट./लायसन्स इंजिनिअर/स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली आवश्यकतेप्रमाणे धोकादायक भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर/परवानाधारक इंजिनिअर यांची यादी नगर रचना कार्यालयाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं. २७४०३६४ व ६८,१०१. नगर अभियंता स्टोअर ०२१७-२७४०३३५. या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे.

तरी सर्व घर मालकांनी, भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळयात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य कारावे.

सही/-
डॉ. सचिन ओंबासे भा.प्र.से.
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर


# माऊलीच्या अश्वाचे २७ जून रोजी प्रस्थान
## परंपरेनुसार नियोजित ठिकाणी मुक्काम





सोहळ्यात रोज पहाटे ४ वाजता अश्वास निमंत्रण द्यायला चोपदार जातात व त्यानंतर साडेपाच वाजता हा अश्व दर्शनासाठी माऊलींच्या पादुकांजवळ येतो व त्यावेळी त्याच्या गळयात पुष्पहार घातला जातो व तिथून तो पुढे चालण्यास मार्गस्थ होतो. सोहळ्यात व इतर वेळी कधीही माऊली अश्वावर कोणीही बसत नाही. त्यावर स्वतः माऊली स्वार असतात.

**महादजीराजे शितोळे सरकार**
(अंकलीकर)

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** आळंदी ते पंढरपूर असा प्रवास करण्यासाठी शितोळे अंकली येथून माऊलींच्या मानाचे अश्व २७ जून रोजी शितोळे सरकार राजवाड्यातून प्रस्थान करणार आहे. त्यानुसार सर्व तयारी पूर्णत्वास आली आहे, अशी माहिती पत्रकाद्वारे श्रीमंत महादजीराजे शितोळे सरकार यांनी दिली आहे. अश्वांचा मान परंपरागत असून परंपरेनुसार ठरवून दिलेल्या नियोजित ठिकाणी माऊलींच्या आश्वाचे मुक्काम होणार आहे. २७ जून रोजी गावच्या वेशीकडे प्रस्थान झाल्यानंतर दुपारी १२ वाजता अंकली ते आळंदी प्रवास सुरू होईल. २७ जून रोजी अंकलीतून प्रस्थान केल्यानंतर पहिला मुक्काम मिरज, २८ रोजी सांगलवाडी, २९ रोजी इश्वरपूर पेठनाका, ३० रोजी वहागाव, दि. १ जुलै रोजी भरतगाव, २ रोजी भुईज, ३ रोजी सारोळा, ४ रोजी शिंदेवाडी, ५ व ६ रोजी पुणे व ७ जून रोजी आळंदी येथे माऊलींच्या अश्वाचा मुक्काम असणार आहे. अंकली ते आळंदी हा सुमारे ३१५ कि. मी. चा प्रवास अश्वांसह स्वार आणि त्यांचे पथक यांचा पायी असणार आहे. रोज साधारण

३० कि. मी. चा प्रवासाचा टप्पा पूर्ण केला जाणार आहे. सायंकाळी नियोजित ठिकाणी मुक्काम केला जाणार आहे. मुक्कामाची ठिकाणे परंपरेनुसार ठरलेली असतात. वारी काळात दुपारच्या मुक्काम ठिकाणी माऊलींना आरतीनंतर पुरणपोळीचा महानैवेद्य दाखवला जातो. हा मान परंपरेनुसार शितोळे सरकारांकडे असून, या महानैवेद्याच्या साहित्याचा ट्रॅक्टरही अंकलीहून याच दिवशी निघणार आहे. यावर्षी परंपरेनुसार नियोजन करण्यात आले आहे. आळंदी येथे आगमन झाल्यानंतर दिंडीचे मालक बाळासाहेब आरफळकर पवार व ज्ञानेश्वर माऊली देवस्थानच्यावतीने स्वागत करण्यात येणार आहे. यावेळी माऊलींचे अश्व गाभार्यात जाऊन माउलींच्या पादुकांचे दर्शन घेणार आहेत. आषाढी एकादशी झाल्यावर माऊलीचा परतीचा प्रवास चालू होईल तेव्हा पंढरपूरच्या वेशीपर्यंत हे अश्व निरोप देण्यासाठी जातील व तिथून मग ते अंकलीकडे मार्गस्थ होतात, असे महादजीराजे शितोळे सरकार यांनी सांगीतले.

१८३२ मध्ये हैबतबाबांनी माऊलींचा सोहळा सुरू केला, तेव्हा शितोळे सरकारांनी या सोहळयास राजाश्रय दिला. त्यानुसार रोज शितोळे सरकारांच्या तंबूत माऊलींच्या पादुकांचा मुक्काम, नैवेद्य, समाज आरतीस स्वतः किंवा प्रतिनिधींची उपस्थिती, वारीतील न्यायनिवाडा शितोळे सरकारांच्या ध्वजाखाली होणे हे रीतिरिवाज कायम आहेत.


**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

मुक्तार इसाक शिकलकर,वय-५० वर्षे,धंदा-मजुरी, रा. बिटले, ता. मोहोळ,जि. सोलापूर. } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत बिटले, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत बिटले, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार मुक्तार इसाक शिकलकर यांचा जन्म ता.०१/०६/१९७६ रोजी मौजे बिटले, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराच्या जन्म दाखल्याची ता.१५/०४/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९७६ चे अभिलेखात अर्जदार यांच्या जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदाराच्या जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.

याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. सागर अशोक चव्हाण,वय-२२ वर्षे,धंदा-मजुरी, रा. काळेवाडी (बिटले), ता. मोहोळ,जि. सोलापूर. } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत बिटले, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत बिटले, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची पत्नी कल्पना दादाराव भोसले (लग्नाअगोदरचे नांव) कल्पना सागर चव्हाण (लग्नानंतरचे नांव) हिचा जन्म ता. ०१/०६/२००८ रोजी मौजे बिटले, मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराच्या पत्नी जन्म दाखल्याची ता. २३/०३/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन २००८ चे अभिलेखात अर्जदार यांच्या पत्नीच्या जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदाराच्या पत्नीची जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.

याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** कि. अर्ज नं. ३०१/२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

किरण भुजंग काळे,वय-३१ वर्षे,धंदा-मजुरी, रा. बुद्रुकवाडी, पो.मानेगांव,ता. माढा, जि. सोलापूर. } अर्जदार
विरूध्द
ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत भांबेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } सामनेवाला

ज्याअर्थी यातील अर्जदार किरण भुजंग काळे, यांचा मुलगा नामे कृष्णा किरण काळे हा मौजे भांबेवाडी, ता. मोहोळ येथे दि. २७/०३/२०१६ रोजी जन्मलेला आहे. त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांचे जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी चे जन्माचे रजिस्टरला व्हावे याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार किरण भुजंग काळे, यांचा मुलगा नामे कृष्णा किरण काळे याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत भांबेवाडी, यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत अथवा दि. १९/०६/२०२६ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत म्हणणे न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जातील मागणी प्रमाणे पुढील जरुर ते आदेश होतील याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. नाथा भगवान चौगुले,वय-३७ वर्षे,धंदा-मजुरी, रा. मोहोळ रेल्वे स्टेशन कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत कोळेगांव, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कोळेगांव, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचे आजोबा आप्पाजी लिंबाजी चौगुले यांचा मृत्यु ता. ०२/०४/१९८५ रोजी मौजे कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे घरीच मयत झाले आहेत. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचे आजोबा म्हणजेच आप्पाजी लिंबाजी चौगुले यांचे मृत्यु दाखल्याची ता. ०२/०४/१९८५ रोजीप्रमाणे मागणी नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे एप्रिल १९८५ चे अभिलेखात अर्जदाराचे आजोबा आप्पाजी लिंबाजी चौगुले यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. मनोहर शामराव चव्हाण,वय-५०वर्षे,धंदा-मजुरी, रा. मोहोळ रेल्वे स्टेशन मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत कोळेगांव, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कोळेगांव, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचे आजोबा भिवाजी सिध्दू चव्हाण यांचा मृत्यु ता. ०२/०५/१९७३ रोजी मौजे कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे घरीच मयत झाले आहेत. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचे आजोबा म्हणजेच भिवाजी सिध्दु चव्हाण यांचे मृत्यु दाखल्याची ता. ०२/०५/१९७३ रोजीप्रमाणे मागणी नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९७३ चे अभिलेखात अर्जदाराचे आजोबा भिवाजी सिध्द चव्हाण यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १९/६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

कार्तिक संजय मेटकरी,वयः-२२ वर्षे, धंदा-शेती, रा. कोन्हेरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत कोन्हेरी, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कोन्हेरी, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार नामे कार्तिक संजय मेटकरी यांचा जन्म ता.१०/०६/२००४ रोजी मौजे कोन्हेरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांचा जन्म दाखल्याची ता. २९/०४/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन २००४ चे अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.

त्याअर्थी याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.४/६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री.करण दादाराव इंगोले,वय-१९ वर्षे,धंदा-मजुरी, रा.काळेवाडी (बिटले)ता.मोहोळ,जि.सोलापूर } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत बिटले, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत बिटले, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता.०२/०५/२००८ रोजी मौजे काळेवाडी (बिटले), ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराच्या जन्म दाखल्याची ता. ०२/०५/२००८ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे २००८ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच करण दादाराव इंगोले यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.

**जाहिर प्रसिध्दीकरण** क्र. अभि/कावि नं. /२०२६
**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. नाथा भगवान चौगुले,वय-३७ वर्षे,धंदा-मजुरी, रा. मोहोळ रेल्वे स्टेशन कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत कोळेगांव, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत कोळेगांव, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता. ०१/०१/१९८८ रोजी मौजे कोळेगांव, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराच्या जन्म दाखल्याची ता. ०९/०१/१९८८ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी १९८८ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच नाथा भगवान चौगुले यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. १९/०६/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.०४/०६/२०२६

शिक्का
सही/-
तहसिलदार,मोहोळ.



# Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह**
**दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779



**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ८ |
| ९ | | ■ | १० | | | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | ११ | ■ | ■ | १२ | १३ | ■ | १४ | | १५ | |
| १६ | १७ | | १८ | ■ | ■ | १९ | | | ■ | | ■ |
| २० | | ■ | २१ | | २२ | | ■ | २३ | २४ | ■ | २५ |
| ■ | २६ | | | ■ | | ■ | २७ | | | २८ | |
| २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | | ■ | ३२ | | ■ |
| | ■ | ३३ | | | ■ | ३४ | | ३५ | | ■ | ३६ |
| ३७ | | | | ■ | ३८ | | ■ | | ■ | ३९ | |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ४० | | ४१ | | ■ |
| ४२ | ४३ | | ■ | ४४ | | | | ■ | ४५ | | ४६ |
| ४७ | | ■ | ४८ | | | ■ | ■ | ■ | | ■ | |

**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 269

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 6 | | 1 | | | | 5 |
| | | | 3 | 9 | | | | |
| | 7 | | 2 | 6 | | 8 | | 1 |
| | 9 | 7 | | | | | | |
| 3 | | 2 | 9 | 5 | 1 | 6 | | 7 |
| | 6 | | | | | | 1 | |
| 2 | 1 | | 7 | | 6 | 5 | 3 | 8 |
| | 8 | | | 2 | | 4 | | 9 |
| | | | 5 | | 9 | 1 | 6 | |

# सोलापूरसाठी राज्यस्तरीय स्पर्धेत श्रावणी सूर्यवंशी पटकावले ५ गोल्ड मेडल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील मार्कंडेय जलतरण तलाव येथे महाराष्ट्र स्टेट जूनियर अँड सब जूनियर अक्वेटिक चैम्पियनशिप २०२६, डाइविंग ही स्पर्धा दि. ३० व ३१ मे दरम्यान पार पडली. या स्स्पर्धेत सोलापुर च्या श्रावणी सूर्यवंशी हीने १ मीटर स्प्रिंगबोर्ड, ३ मीटर स्प्रिंगबोर्ड, हाईबोर्ड मध्ये अनुक्रमे २४६.८५, २९३.२५, ३०४.४० गुणासह ३ गोल्ड मेडल आपल्या नावावर केली आहेत. तसेच दि. २३ व २४ मे २०२६ रोजी मुंबई येथिल गोरेगांव स्पोर्ट्स क्लब येथे पार पड़लेल्या महाराष्ट्र स्टैट सिनियर एक्वाटिक चैम्पियनशिप २०२६ स्पर्धेत सोलापुरचे प्रतिनिधित्व करताना ३ मीटर स्प्रिंगबोर्ड व हाईबोर्ड मध्ये अनुक्रमे १५१.३० व १८२.०५ गुणासह २ गोल्ड मेडल पटकावले आहेत. यप्रमाणे यंदाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत श्रावणी सूर्यवंशी ने सोलापुर चे प्रतिनिधित्व करताना ५ गोल्ड मेडल ची कमाई केली आहे.

श्रावणीने आजवर डायव्हींग क्रीडा प्रकारामध्ये शालेय आणि फेडरेशन च्या वतीने घेतल्या गेलेल्या स्पर्धेत –

- राज्य पातळीवर 30 गोल्ड, 6 सिल्वर, 1 बाँझ
- राष्ट्रीय पातळीवर 20 गोल्ड, 5 सिल्वर, 2 बाँझ,
- आतंरराष्ट्रीय २ गोल्ड, 4 सिल्वर, 2 बाँझ
- एकूण – 52 गोल्ड , 15 सिल्वर, 5 ब्राँझ

यप्रमाणे तिने एकूण 72 पदके वयाच्या अवघ्या 17 व्या वर्षात आपल्या नावांवर केली आहेत. यासाठी तिला, तिचे आंतरराष्ट्रीय दजार्चे कोच श्रीकांत शेटे सरांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

# नाले स्वच्छ ठेवा, पाणी साचू देऊ नका; महापौर कोंड्याल यांचे अधिकाऱ्यांना आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी पावसाळ्याच्या अनुषंगाने महापौर विनायक कोंड्याल यांनी आज नीलम नगर, अक्कलकोट रोड परिसरातील नवले नगर, विनायक नगर, वज्रेश्वरी नगर तसेच मुद्रा सन सिटी येथील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. मागील पावसाळ्यात या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.




पाहणीदरम्यान नाल्यांची स्वच्छता, पाण्याचा निचरा, अडथळे तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्याच्या व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नवले नगर, विनायक नगर, वज्रेश्वरी नगर आणि मुद्रा सन सिटी परिसरात पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

यावेळी वज्रेश्वरी नगर व मुद्रा सन सिटी परिसरातील राष्ट्रीय महामार्गालगतच्या नाल्यांची पाहणी करण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या तसेच प्रस्तावित नाल्यांच्या कामांचा आढावा घेऊन पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाईल यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले.

या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, यंत्रमाग संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, नगरसेविका सारिका खजूरगी, नगर अभियंता सारिका आकूलवार, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सुनील फुलारी, महेश येमूल, उपअभियंता प्रकाश दिवाणजी, मनोज जाधव, चिंतारे तसेच चंद्रकांत गुंडे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महापौरांनी नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक उपाययोजना पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

# अक्कलकोट तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांची आरक्षण सोडत १२ जूनला

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडत प्रक्रियेची तयारी सुरू झाली असून ही प्रक्रिया पारदर्शक व नियोजनबध्द पध्दतीने पार पाडावी यासाठी तहसील कार्यालयाकडून प्राधिकृत अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तहसीलदार विनायक मगर यांनी याबाबत आदेश जारी केला असून ग्रामपंचायतनिहाय जवाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. त्यासाठी ८ जून रोजी विशेष ग्रामसभेची सूचना देण्यात येणार असून १२ जून रोजी प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढली जाणार आहे. या प्रक्रियेसंदर्भात ५ जून रोजी तहसील कार्यालयात बैठकही आयोजित करण्यात आली आहे.

आरक्षण सोडत प्रक्रियेत येऊ नये म्हणून विविध विभागांतील अधिकारी, मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, शाखा अभियंते, कृषी व जलसंधारण विभागातील कर्मचाऱ्यांची ग्रामपंचायतनिहाय नेमणूक करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या नेमून दिलेल्या ग्रामपंचायतीच्या




मुख्यालयी उपस्थित राहून आरक्षण सोडत पूर्ण करावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतींची जबाबदारी दिलेल्या अधिकाऱ्यांनी सकाळी १० वाजता आणि दुपारी २ वाजता अशा यांमध्ये सोडत प्रक्रिया राबवावी, असेही नमूद आहे.

आरक्षण सोडतीची प्रक्रिया महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राबवण्यात येणार असून त्याच दिवशी इतिवृत्तासह अहवाल तहसील कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. बैठकीस अनुपस्थित राहिल्यास संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा इशाराही तहसीलदारांनी दिला आहे.

**या गावांचे आरक्षण निघणार**

वागदरी, खैराट, हन्नूर, वळगाव, दोडयाळ, जेऊर, तोळणूर, हैद्रा, कर्जाळ, नागणसूर, गुरववाडी, उडगी, कुरनूर, किसी, कोर्सगाव, हंद्राळ, कुमठे, आळगे, सुलेरजवळगे, हिळ्ळी, चुंगी आदी गावांचा समावेश आहे. प्रशासनाने तारीख जाहीर केल्याने गावांमधील सदस्यपदाच्या आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणी दंड न भरल्यास मालमत्ता जप्त; लिलावातून वसुली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील ५४ मीटर बाह्यवळण रस्त्यालगतच्या सलगर वस्ती परिसरात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणात संबंधित जागा मालकांवर महापालिकेकडून कठोर कारवाईची तयारी सुरू झाली आहे. या प्रकरणात आकारण्यात येणारा दंड न भरल्यास संबंधितांची मालमत्ता जप्त करून त्याच्या लिलावातून रक्कम वसूल करण्यात येईल, असा इशारा महापालिका आयुक्त सचिन ओंबासे यांनी दिला.



सलगर वस्ती परिसरातील एका खासगी जागेत तब्बल ११८ वृक्षांची बेकायदेशीर तोड करून त्याची विक्री होत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. हा प्रकार समोर आल्यानंतर संबंधित जागा मालकांचा शोध घेण्यास प्रशासनाला काही दिवस अडचणी आल्या. सातबारा उतारा मिळाल्यानंतर अखेर महापालिकेने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

या प्रकरणी पोलिसांनी अंकित शिवानंद पाटील, आशा राजेंद्र हजारे, राजेंद्र पुंडलिक हजारे आणि शिवानंद यशवंत पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतरही दंडात्मक कारवाईबाबत विलंब होत असल्याची टीका होत होती.

दरम्यान, बुधवारी आयुक्त सचिन ओंबासे यांनी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी संबंधित जागा मालकांना नोटीस बजावून दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आयुक्तांनी सांगितले की, वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठी हानी झाली असून अशा प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही. नियमानुसार मोठा दंड आकारला जाईल आणि तो न भरल्यास मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येईल.

**उपमहापौरांच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासन सक्रिय**

वृक्षतोडीसारखा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतरही प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई केली नसल्याबद्दल उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. तसेच एवढ्या मोठ्या घटनेनंतर महापालिका आयुक्तांनी घटनास्थळी भेट का दिली नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर आयुक्तांनी स्वतः घटनास्थळी भेट देत पुढील कारवाईची दिशा स्पष्ट केली.

महापालिकेच्या या भूमिकेमुळे बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात प्रशासन कठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# एन.बी. नवले सिंहगड महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या समाजकल्याणकारी कायार्चा, न्यायप्रिय प्रशासनाचा आणि स्त्री सक्षमीकरणासाठी दिलेल्या योगदानाचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात



आला. कार्यक्रमास जी.एस.ई. विभागप्रमुख डॉ. के.एस. पाटील, प्रा.एस.बी. नवले, प्रा.वाय.एन. बनसोडे, अझहर पाटील, ग्रंथपाल जी.एच. घोगले, ग्रंथपाल विद्यानंद बाबर, पी.एस.शिंदे, जी. डी. अतनुरे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श कायार्तून प्रेरणा घेऊन समाजसेवा, सुशासन आणि मानवतावादी मूल्ये जोपासण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले.

# २५ वर्षे अपघातमुक्त सेवेसाठी सोलापूर एसटीच्या २० चालकांचा गौरव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापूर विभागातर्फे २५ वर्षे विना अपघात सुरक्षित सेवा बजावणाऱ्या २० चालकांचा त्यांच्या पत्नींसह गौरव करण्यात आला. सुरक्षित व जबाबदार सेवेमुळे एसटीची प्रतिमा उंचावणाऱ्या चालकांच्या कायार्चा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी होते. सन्मानित चालकांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, २५ वर्षे सुरक्षित सेवा बिल्ला तसेच २५ हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात अमोल गोंजारी यांनी एसटीच्या प्रवाशांची सुरक्षितता हीच चालकांची सर्वात मोठी जबाबदारी असल्याचे सांगितले. तब्बल २५ वर्षे अपघातमुक्त सेवा देणे ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब असल्याचे नमूद करत त्यांनी सर्व सन्मानित चालकांचे अभिनंदन केले. त्यांच्या कायार्मुळे एसटी महामंडळावरील प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी यंत्र अभियंता शीतल बिराजदार, कामगार अधिकारी सुतार, विभागीय वाहतूक अधिकारी नखाते, विभागीय लेखा अधिकारी कुलकर्णी, विभागीय सांख्यिकी अधिकारी कौलगे तसेच भांडार अधिकारी मदने–पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या सन्मान सोहळ्यामुळे सुरक्षित वाहनचालकांना प्रोत्साहन मिळाले असून, अपघातमुक्त सेवेसाठी इतर चालकांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अक्कलकोटात सोलर प्रकल्पांची क्रेझ हजारो एकर जमीन भाडेतत्त्वावर

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** दुष्काळ, अवकाळी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा दर यामुळे शेतीतील उत्पन्न दिवसेंदिवस अनिश्चित होत चालले आहे. अशा परिस्थितीत निश्चित आर्थिक उत्पन्नाच्या शोधात अक्कलकोट तालुक्यातील अनेक शेतकरी स्वखुशीने आपल्या शेतजमिनी सौरऊर्जा (सोलर) प्रकल्पांसाठी भाडेतत्त्वावर देत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तालुक्यातील हसापूर, हत्तीकणबस, चपळगाव, बॅगेहळ्ळी आदी भागांमध्ये विविध सोलर कंपन्यांनी प्रकल्प उभारण्यास सुरुवात केली आहे. या कंपन्यांकडून शेतकऱ्यांना प्रति एकर वार्षिक सुमारे ५० हजार रुपये भाडे देण्याची ऑफर दिली जात असल्याने या प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. वर्षभर शेती करूनही हमखास उत्पन्नाची शाश्वती नसताना सोलर प्रकल्पातून मिळणारे निश्चित भाडे शेतकऱ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

विशेष म्हणजे बहुतांश ठिकाणी शेतकरी कोणत्याही दबावाशिवाय स्वतःहून जमीन भाडेतत्त्वावर देत आहेत. शेतीतील जोखीम कमी करून कुटुंबाला स्थिर आर्थिक आधार मिळावा, हा त्यामागील प्रमुख उद्देश असल्याचे शेतकरी सांगतात. सलग काही वर्षे नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांनी सोलर



**प्रति एकर ५० हजारांचे वार्षिक भाडे**

सोलर कंपन्यांकडून शेतकऱ्यांना प्रति एकर सुमारे ५० हजार रुपये वार्षिक भाडे दिले जात आहे. निश्चित उत्पन्न, कमी जोखीम आणि दीर्घकालीन करार यामुळे अनेक शेतकरी सोलर प्रकल्पांसाठी जमीन भाडेतत्त्वावर देण्यास प्राधान्य देत आहेत.

प्रकल्प हा अधिक सुरक्षित आणि फायदेशीर पर्याय असल्याचे मत व्यक्त केले आहे.

अक्कलकोट तालुक्याचा मोठा भाग कोरडवाहू असून शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. अनेकदा अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यातच बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि वीज खर्च सातत्याने वाढत असल्याने शेतीचे गणित अधिकच कठीण बनले आहे. अशा वेळी सोलर प्रकल्पांमधून मिळणारे नियमित उत्पन्न शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

तज्ज्ञांच्या मते, देशातील वाढत्या वीज गरजांमुळे ग्रामीण भागात सौरऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढत आहे. हे प्रकल्प पर्यावरणपूरक असले तरी शेतीयोग्य जमिनीचा वापर ऊर्जानिर्मितीसाठी होत असल्याने भविष्यात त्याचे सामाजिक आणि आर्थिक परिणाम अभ्यासणे आवश्यक ठरणार आहे.

दरम्यान, तालुक्यात हजारो एकर जमीन सोलर प्रकल्पांसाठी भाडेतत्त्वावर जात असल्याने ग्रामीण अर्थकारणातही बदल घडू लागले आहेत. शेतीतील अनिश्चिततेपेक्षा नियमित उत्पन्नाचा मार्ग स्वीकारणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत असून, अक्कलकोट तालुक्यात सौरऊर्जा प्रकल्पांचा वाढता विस्तार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.

# इंधन दरवाढीने सर्वसामान्यांचे आर्थिक गणित विस्कळीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** पेट्रोल आणि डिझेलच्या दरातील सातत्याने होत असलेल्या वाढीमुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि वाहनचालकांचे आर्थिक गणित बिघडले आहे. इंधन दरवाढीचा परिणाम केवळ वाहनधारकांपुरता मर्यादित न राहता शेती, मालवाहतूक, किरकोळ बाजारपेठ आणि दैनंदिन जीवनावरही होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. वाढत्या इंधन खर्चामुळे महागाईचा ताण अधिक तीव्र झाल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.



खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ट्रॅक्टरद्वारे मशागत, औषध फवारणी, विहिरी व बोअरवेलवरील पंप चालविणे तसेच शेतमाल बाजारात नेण्यासाठी डिझेलचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढत असून शेती परवडेनाशी होत असल्याची प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत. पीककर्जासाठी धावपळ सुरू असतानाच वाढत्या खर्चामुळे आर्थिक अडचणी अधिक गंभीर होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

इंधन दरवाढीचा मोठा फटका मालवाहतूक क्षेत्रालाही बसत आहे. ट्रक, टेम्पो आणि इतर मालवाहू वाहनांच्या संचालन खर्चात वाढ झाल्याने वाहतूक भाडे वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम किराणा माल, भाजीपाला, फळे आणि बांधकाम साहित्याच्या किमतींवर होत असून ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत आहेत. वाहतूक खर्च सातत्याने वाढत असल्याने वस्तूंचे दर स्थिर ठेवणे कठीण होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा मर्यादित असल्याने अनेक नोकरदार, विद्यार्थी आणि छोटे व्यावसायिक दैनंदिन प्रवासासाठी दुचाकींवर अवलंबून आहेत. पेट्रोलच्या वाढत्या दरामुळे त्यांच्या मासिक खर्चात लक्षणीय वाढ झाली असून घरगुती बजेटवर अतिरिक्त ताण पडत आहे.

इंधन दरवाढीचे परिणाम सर्वच स्तरांवर जाणवत असल्याने शासनाने कररचनेचा फेरविचार करून पेट्रोल–डिझेलच्या किमती नियंत्रणात आणाव्यात, अशी मागणी नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गातून होत आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना तातडीने जाहीर करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

# मुख्य जलवाहिनीतील गळतीमुळे बार्शीत पाच दिवसांपासून पाणीटंचाई

**बार्शी (कटूसत्य वृत्त):** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीतील गळतीची समस्या अद्याप कायम असल्याने बार्शीकरांना गेल्या पाच दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. ऐन उन्हाळ्यात पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये नियमित पाणीपुरवठा कोलमडला असून काही ठिकाणी अत्यल्प दाबाने पाणी येत आहे, तर काही परिसरांत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद आहे. अनेक भागांमध्ये वेळापत्रकापेक्षा उशिराने पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. परिणामी, पिण्याच्या पाण्यासाठी खासगी टँकर तसेच



इतर पर्यायी साधनांचा आधार घ्यावा लागत आहे.

बार्शी तालुका अवर्षणग्रस्त म्हणून ओळखला जात असल्याने येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणात अवलंबित्व जलस्रोत आणि पाणीपुरवठा यंत्रणेवर आहे. अशा परिस्थितीत उजनी जलवाहिनीतील गळतीमुळे निर्माण झालेल्या अडचणींमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची गरज अधिक असताना पुरवठा खंडित झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगण्यात येत असले, तरी समस्या अद्याप पूर्णपणे सुटलेली नाही. तांत्रिक अडचणी आणि दुरुस्तीला लागणारा कालावधी यामुळे पाणीपुरवठा पूर्ववत होण्यास विलंब होत असल्याचे समजते. याबाबत नगरपालिका जलदाय अभियंता अजय होनखांबे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

दरम्यान, शहरातील नागरिकांनी जलवाहिनीची कायमस्वरूपी दुरुस्ती करून भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत, यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. तसेच पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पयार्यी पाणीपुरवठ्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्याची अपेक्षाही व्यक्त केली आहे.

नगरपालिका प्रशासनाने गळती दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून पाणीपुरवठा लवकरच पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला आहे. मात्र, गेल्या पाच दिवसांपासून पाण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या बार्शीकरांचे लक्ष आता पाणीपुरवठा नेमका कधी सुरळीत होणार याकडे लागले आहे.